# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## सोमवार, दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ / कार्तिक २९, १९४५ शके

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

१३८. सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभेचे सन २०२३ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन सोमवार, दिनांक १७ जुलै, २०२३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन शुक्रवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या व्दितीय सत्रात एकूण २३५ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले होते. २३५ निवेदनांपैकी ९२ निवेदने सोमवार, दिनांक २८ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १२१ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. प्रलंबित १४३ निवेदनांपैकी ४८ निवेदने गुरुवार, दिनांक २१ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १२३ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. एकूण प्रलंबित ९५ निवेदनांपैकी ३० निवेदने गुरुवार, दिनांक २१ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १३३ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. आता ६५ निवेदनांपैकी ७ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : २० नोव्हेंबर, २०२३**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)
४. अनुवाद कक्ष
५. प्रतिवेदन

## सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन
## महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१६२९

**श्री.सचिन कल्याणशेट्टी, श्री.समाधान अवताडे आणि श्री.सुभाष देशमुख, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"सोलापूर समाज कल्याण आयुक्त श्री नागनाथ चौगुले यांची बदली पदस्थापना होणे श्री नागनाथ चौगुले हे २०१७ मध्ये या पदावर या ठिकाणी असताना त्यांच्या विरोधात अनेक तक्रारी असणे व त्या तक्रारीवरून शासनाने २५ ऑक्टोबर, २०१७ रोजी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करून निलंबन करणे व त्यांची तिथून बदली होणे, परंतु श्री. नागनाथ चौगुले यांच्या विरोधात स्थानिक व प्रशासनातील अनेक कर्मचारी यांच्या अनेक तक्रारी असून त्यांच्या विरोधात चौकशी पूर्ण झालेली नसणे, तरीही परत सोलापूर समाजकल्याण सहाय्यक आयुक्तपदी त्यांची दिनांक २१ फेब्रुवारी, २०२३ रोजी सोलापूर सहाय्यक आयुक्त पदी त्याच ठिकाणी नियुक्त झाल्यामुळे तेथील स्थानिक कर्मचारी व स्थानिक नागरिकांमध्ये शासनाप्रती असंतोष निर्माण होणे श्री. नागनाथ चौगुले यांची नियुक्ती झाल्या झाल्या त्यांनी मनमानी कारभार सुरू करुन कर्मचाऱ्यांना वेठीस धरणे सोलापूर जिल्ह्यातील आश्रम शाळेतील माहे जून २०२३ च्या वेतना वरील खर्च भागवण्यासाठी शासनाने १२.६० कोटी तरतूद करणे, परंतु श्री नागनाथ चौगुले यांनी मागील वर्षाचे थकीत वेतन अदा केल्यामुळे त्यात अनियमितता येणे त्यामुळे ११ शाळेतील शिक्षक कर्मचारी वेतनापासून वंचित राहणे व त्यांचे मानसिक संतुलन बिघडणे श्री. चौगुले हे कर्मचाऱ्यांना असाच त्रास देत असल्यामुळे त्यांच्या विरोधात अनेक तक्रारी झाल्या होत्या व त्यांची चौकशी सुरू असणे, संबंधित विभागाचा श्री. नागनाथ चौगुले यांनी चार्ज घेतल्यापासून सहाय्यक लेखा अधिकारी यांच्याशी कोणतीही चर्चा न करता यांच्या सहमतीशिवाय स्वत:च्या पदाचा गैरवापर करून अनेक फाईल कोणालाही न सांगता मंजूर केल्या असणे जिल्ह्यातील अतिरिक्त कर्मचारी रिक्त पद नसताना स्वतः च्या पदाचा गैरवापर करून कोणाचीही परवानगी न घेता वीस ते पंचवीस लोकांना तात्पुरते समायोजना करून घेणे व त्यात मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार झाल्याची चर्चा सुरू असणे सदर बाब ही अतिशय गंभीर स्वरूपाची असून सदर अधिकारी श्री. नागनाथ चौगुले यांची तात्काळ बदली सोलापूर येथून होणे कारण त्यांची त्या ठिकाणी निलंबनाची कारवाई २०१७ ला झाली असणे त्यांची त्यांनी केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी सुरू असणे त्यामुळे शासनाने या गंभीर स्वरुपाची तात्काळ दखल घेऊन तातडीने करावयाची कारवाई व उपाय योजना.""

### मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन

श्री.नागनाथ चौगुले यांना सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सोलापूर या पदावर कार्यरत असताना त्यांचेविरुध्द कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत खरेदी केलेल्या जमीनीचे लाभार्थ्यांना वाटप न केल्याप्रकरणी, न्यायालयीन प्रकरणांबाबत कार्यवाही न करणे, शिष्यवृत्ती योजनांतर्गत अनुदानासंबंधीची आवश्यक ती माहिती विहीत वेळेत सादर न करणे, डॉ.बाबासाहेबत आंबेडकर समाज उत्थान पुरस्कार व शाहू फुले आंबेडकर पुरस्कार देवून गौरविण्याच्या कार्यक्रमामध्ये राजशिष्टाचार अधिकारी या नात्याने बैठकीस उपस्थित न राहणे, संशोधन अधिकारी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, सोलापूर या पदाचा अतिरिक्त कार्यभार असताना जातवैधता प्रमाणपत्र वेळेत न देणे, संशोधन अधिकारी, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, सोलापूर या पदाचा कार्यभार स्विकारल्यानंतर कार्यभार हस्तांतरण प्रमाणपत्रावर स्वाक्षरी न

(कृ.मा.प.

करता कार्यालयीन वेतन, विद्युत व टेलिफोन देयकांवर स्वाक्षरी करणे, वैद्यकीय रजेवर असताना स्वता:च्या स्वाक्षरीने बऱ्याच प्रकरणांत अनियमितता करणे, वसतिगृह मान्यताप्रकरणी सुनावणी न घेणे या प्रकरणी शिस्तभंग विषयक कार्यवाही करुन दि.०५.१०.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये निलंबित करण्यात आले होते. त्यानंतर श्री.नागनाथ चौगुले यांना दि.०६.०३.२०१८ रोजीच्या शासन ज्ञापनान्वये दोषारोष बजावण्यात आले होते. त्यानुषंगाने दि.०६.०९.२०१८ रोजीच्या आदेशान्वये प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, विभागीय आयुक्तांचे कार्यालय, पुणे यांची नियुक्ती करण्यात आली. त्यानुसार प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी यांनी दि.०६.०३.२०२३ रोजीच्या पत्रान्वये चौकशी अहवाल शासनास सादर केला. सदर चौकशी अहवालामध्ये चौकशी अधिकारी यांनी श्री.चौगुले यांच्यावरील सर्व दोषारोप सिध्द होत नसल्याचा निष्कर्ष काढला. त्यानुसार श्री.नागनाथ चौगुले यांना शासन मान्यतेने दि.२१.०६.२०२३ रोजीच्या आदेशान्वये सर्व दोषारोपातून दोषमुक्त करण्यात आले आहे.

श्री.नागनाथ चौगुले यांना दि.०८.०२.२०१८ रोजीच्या शासन आदेशान्वये संशोधन अधिकारी, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, सोलापूर या पदावर पुन:स्थापित करण्यात आले. त्यानंतर दि.२१.०२.२०२३ रोजीच्या आदेशान्वये श्री.चौगुले यांची सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सोलापूर येथे शासन मान्यतेने बदली करण्यात आली आहे.

सोलापूर जिल्ह्यातील विजाभज आश्रमशाळांतील कर्मचाऱ्यांच्या माहे जून, २०२३ च्या वेतनासाठी रु.१८ कोटी १० लाख तरतुदीची मागणी करण्यात आली होती. तथापि, प्रादेशिक उपायुक्त, इतर मागास बहुजन कल्याण, पुणे विभाग यांनी दि.१३.०७.२०२३ रोजीच्या आदेशान्वये रु.१२ कोटी ६६ लाख १६ हजार रुपये वितरीत केले. त्यामुळे सदरच्या तरतुदीमधून प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक एकूण ८६ आश्रमशाळांचे माहे जून, २०२३ च्या वेतनाची रक्कम रु.१२ कोटी ७० लाख ८७ हजार एक्यानऊ रुपये अदा करण्यात आली. तसेच उर्वरित १२ आश्रमशाळांच्या माहे जून, २०२३ च्या वेतनाकरीता व थकीत वेतनाकरीता आवश्यक असणाऱ्या तरतूदीची मागणी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सोलापूर यांनी दि.१९.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, पुणे यांच्याकडे केली आहे.

सहाय्यक लेखाधिकारी हे दि.०२.०५.२०२३ ते दि.१२.०५.२०२३ तसेच दि.२६.०६.२०२३ ते दि.१२.०७.२०२३ पर्यंत असे एकूण २८ दिवस रजेवर होते. त्यामुळे श्री.चौगुले यांनी सदरचा रजेचा कालावधी वगळता सर्व आर्थिक बाबींच्या नस्ती सहाय्यक लेखाधिकारी यांच्या अभिप्रायानेच मंजूर केल्या आहेत. तसेच दि.०२.०६.२०२३ रोजी सहाय्यक लेखाधिकारी यांची बदली जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या कार्यालयात झाल्यामुळे सहाय्यक लेखाधिकारी हे पद रिक्त आहे. त्याचप्रमाणे दि.१६.०३.२०२३ ते आजतागायत सोलापूर जिल्ह्यातील कोणत्याही अतिरिक्त कर्मचारी यांचे तात्पुरत्या स्वरुपात समायोजन करण्यात आलेले नाही.

***************

लक्षवेधी सूचना क्र. १५५६

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन

**श्री.निलेश लंके, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१५५६ खालीलप्रमाणे आहे :-**

"वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात गेले काही वर्षात आगीच्या घटना सातत्याने वाढत असतानाही, महानगरपालिकेचे मुख्य अग्निशमन अधिकारी पद गेले सात ते आठ वर्षापासून रिक्त असल्याचा प्रकार नुकताच निदर्शनास येणे, आगीच्या वाढत्या घटना विचारात घेता शासनाच्या नगरविकास विभागाने बृहन्मुंबई महापालिकेचे सहाय्यक अग्निशमन अधिकारी यांची वसई-विरार महापालिकेच्या मुख्य अग्निशमन अधिकारी पदावर एक वर्षाच्या प्रतिनियुक्ती करण्याचे जारी केलेले परिपत्रक राजकीय दबाव आणून रद्द करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार घडणे, शासनाने सदर वसई-विरार महापालिकेचे मुख्य अग्निशमन अधिकारी पद भरण्याकरिता जारी केलेले परिपत्रक रद्द केल्याने सदर पद हे प्रभारी अधिकारी यांचेकडेच कायम ठेवण्याचा प्रकार घडणे, विरारच्या विजय वल्लभ हॉस्पीटलला दिनांक २३ एप्रिल, २०२१ रोजी आयसीयू कक्षात आग लागून झालेल्या जळीत कांड प्रकरणात १७ कोविड रुग्णांचा होरपळून मृत्यू झाल्याची भीषण घटना घडणे, महापालिका क्षेत्रात कार्यान्वित असलेल्या बहुसंख्य खाजगी रुग्णालयात फायर ऑडीट करण्यात न येणे, तर काही रुग्णालयात अग्निशमन यंत्रणाच बसविण्यात आली नसल्याचे आढळून येणे, याबाबत शासनाकडे ठोस अधिकृत आकडेवारी उपलब्ध नसणे, अनेक निर्माणाधीन इमारतींमध्ये शहानिशा न करता त्यांना फायर नाहरकत दाखला देणे, वसईत वाढत असलेल्या आगीच्या घटना, त्यावर पालिकेच्या अग्निशमन विभागाकडून कोणतीही प्रभावी अंमलबजावणी करण्यात न येणे, मुख्य अग्निशमन अधिकारी हे पद न भरण्यात काय गौडबंगाल आहे व यात कोणाचे हित जपले जात आहे यासंदर्भात होत असलेली उलटसुलट चर्चा, यामुळे शहरातील करदात्या नागरिकांच्या सुरक्षेबाबत निर्माण झालेला गंभीर प्रश्न, सदर मुख्य अग्निशमन अधिकारी हे पद तातडीने भरण्याची जनतेतून होत असलेली मागणी, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे येथील जनतेत निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

**मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन**

वसई विरार शहर महानगरपालिका या "क" वर्ग महानगरपालिकेची स्थापना दिनांक ०३.०७.२००९ रोजी झाली असून महानगरपालिकेच्या आस्थापनेचा आकृतीबंध व सेवाप्रवेश नियमांना सन २०१४ मध्ये शासन मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर मुख्य अग्निशमन अधिकाऱ्याचे १ पद श्रेणी-१ मध्ये मंजूर असून सदरचे पद नामनिर्देशन/ पदोन्नती / प्रतिनियुक्तीद्वारे भरण्याची तरतुद उपलब्ध आहे. उपरोक्त पद भरती संदर्भात महानगरपालिकेमार्फत आजतागायत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, ही वस्तुस्थिती आहे.

कृ.मा.प.

ROTA - H-1344-1(750-10-2023)

वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार अग्निशमन विभागाच्या उपमुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर श्री. दिलीप पालव यांची दिनांक ०१.०१.२०१६ पासून नेमणूक करण्यात आली असून सद्यस्थितीत त्यांच्याकडे प्रभारी मुख्य अग्निशमन अधिकारी पदाचा कार्यभार देण्यात आला आहे.

दरम्यान मुख्य अग्निशमन अधिकारी, वसई विरार शहर महानगरपालिका या पदावर शासनाने दिनांक १५.१२.२०२२ रोजीच्या आदेशान्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलातील सहाय्यक विभागीय अग्निशमन अधिकारी यांची प्रतिनियुक्तीद्वारे पदस्थापना केली आहे. तद्नुसार संबंधित अधिकारी यांच्या कार्यमुक्तीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून विविध अटी व शर्ती कळविण्यात आल्या आहेत. तथापि, उपरोक्त अटी व शर्ती वसई विरार शहर महानगरपालिकेला मान्य नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेस उलट टपाली कळविण्यात आले आहे. उक्त प्रकरणाच्या अनुषंगाने सद्यस्थितीत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर अग्निशमन विभागात २२६ पदे विविध संवर्गात शासनाने मंजूर केले असून त्यापैकी २१९ पदे सद्यस्थितीत रिक्त असल्याने या विभागाचे दैनंदिन कामकाज ठेक्याद्वारे नियुक्त कर्मचाऱ्यांकडून करण्यात येत आहे. मागील ५ वर्षाच्या आगीच्या वर्दीच्या तपशिलानुसार वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात सन २०२१-२२ मध्ये २० व सन २०२२-२३ मध्ये १७ वर्दीची नोंद झाली आहे. तथापि, दिनांक २३.०४.२०२१ रोजी विजय वल्लभ रुग्णालयाच्या आय.सी.यू. विभागात शॉर्ट सर्किटमुळे झालेल्या आगीच्या दुर्घटनेत १५ रुग्णांचा होरपळून मृत्यू झाला आहे, ही वस्तुस्थिती आहे. वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात ३३३ नोंदणीकृत रुग्णालय असून त्यापैकी ३०८ रूग्णालयाचे फायर ऑडिट केले असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे. तसेच सदर रुग्णालयामध्ये आग प्रतिबंधक व जीव संरक्षण उपाययोजना धोरणानुसार अत्यावश्यक यंत्रणा उपलब्ध आहेत.

वसई - विरार शहर क्षेत्रातील आगीच्या दुर्घटना व त्यामुळे जिवितास होणारा धोका विचारात घेता महानगरपालिकेकडून आग प्रतिबंधक उपाययोजना करणेबाबत सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत. महानगरपालिकेकडे दाखल होणाऱ्या विकास प्रस्तावांतर्गत अग्निशमन यंत्रणा विषयक सर्व प्रचलित अटी व शर्ती पूर्ण केल्याची खातरजमा करुन तद्नंतरच परवानगी प्रदान करण्यात येत आहे. तसेच विकासकास सदर यंत्रणा सदैव तत्पर व कार्यान्वित ठेवण्याकरीता आवश्यक त्या सूचना देण्यात येतात. तसेच महानगरपालिका क्षेत्रातील विविध स्वरुपाच्या व्यवसायिक आस्थापनेकडील आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अनुषंगाने सर्व यंत्रणेची नियमितपणे तपासणी करण्यात येते.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अत्यावश्यक पदे तात्काळ भरणे संदर्भात शासनाने दिनांक १४.०२.२०२३ रोजी आदेश निर्गमित केले असून प्रस्तुत लक्षवेधी सूचनेचे गांभिर्य विचारात घेता अग्निशमन विभागातील रिक्त पदे तात्काळ विहित कार्यपध्दतीने भरणे संदर्भात कार्यवाही करण्याचे आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना आदेशीत करण्यात येत आहे.

*****

H-1344-1A

लक्षवेधी सूचना १६८२

## सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**सर्वश्री श्री. संजय जगताप, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. संग्राम थोपटे, श्री. अमिन पटेल, वि.स.स** यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"पुणे शहरासाठी याअधी लागू असलेल्या तत्कालीन विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार ४००० चौ.मी. (०.४ हेक्टर) क्षेत्रापेक्षा जास्त जागेकारिता १५% ॲमिनिटी स्पेस सोडणे बंधनकारक असणे, मात्र आता मंजूर झालेल्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) नुसार, विकसकास/ जमीन मालकास २०,००० चौ.मी. क्षेत्रापर्यंत ॲमेनिटी स्पेस सोडणेस पूर्ण सवलत दिली असून २०,००० चौ. मी. पेक्षा जास्त जागेकारिता अवघी ५% जागा ॲमिनिटी स्पेस म्हणून सोडणे बंधनकारक असणे, म्हणजे आता यापुढे २०,००० चौ. मी. पर्यंत जागेसाठी विकास करताना विकसका / जमीन मालकाकडून ॲमेनिटी स्पेस साठी फक्त कोणतीही जागा उपलब्ध नसणार ही वस्तुस्थिती असणे, अतिशय दाट लोकवस्तीच्या महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये जागांचे विभाजन जास्त प्रमाणात झाले असून, एक हेक्टरपेक्षा जास्त जागा कोणत्या विकसकाकडे / जमीन मालकाकडे उपलब्ध असण्याची शक्यता कमीच असणे, नवीन Udcpr नुसार ॲमेनिटी स्पेस विकासकाला डेव्हलप करण्यास परवानगी देण्यात येणे, यामुळे पुणे मनपा हद्दीत बहुतांशी विकासक ॲमेनिटी स्पेस महानगरपालिकेकडे हस्तांतरित न करता स्वतः विकसित करणे, यामुळे महापालिकेकडे येणार्या ॲमेनिटी स्पेस जागा बंद झाल्या असणे, विकास आराखड्यातील आरक्षणा व्यतिरिक्त कोणताही छोटी मोठी जागा सार्वजनिक कामासाठी उपलब्ध होत नसणे, बिल्डर कडून विकसित झालेली ॲमेनिटी स्पेस मधून महानगरपालिकेला कोणताच फायदा होत नसून विकसक स्वतः चा फायदा हेरून ॲमेनिटी स्पेस डेव्हलप करत असणे, पूर्व मान्य लेआऊट मधील ॲमेनिटी स्पेस रद्द करता येणार नाहीत अशी स्पष्ट तरतूद असताना गेल्या ३ वर्षांत महानगरपालिकेकडून बेकायदेशीरपणे लेआऊट सुधारित करून ॲमेनिटी स्पेस बिल्डरच्या फायद्यासाठी रद्द केल्या असणे, पुणे शहराचा एकूण २५० चौ. कि. मी. क्षेत्रफळासाठी सन २००७ ते २०२७ करिता स्वतंत्र विकास योजना मंजूर असून, त्यामध्ये विकास योजना रस्त्यासह उद्याने, क्रीडांगण, प्राथमिक किंवा माध्यमिक शाळा खेळाची मैदाने, अग्निशमन केंद्र, पोलिस ठाणे इ. १९ सुविधा विकसित करण्यासाठी जागा आरक्षित ठेवण्यात येणे, ह्या ॲमिनिटी स्पेस विकसकाने विविध सुविधांकरिता विकसित करावयाचे असतात. त्यातील फक्त बगिचा, क्रीडांगण, प्राथमिक शाळा, दवाखाने, अग्निशमन, प्रकल्पग्रस्त व्यक्तीसाठी घरे इ. सुविधा विकासकाने विकसित करुन नियोजित प्राधिकरणास / महानगरपालिकेस हस्तांतरित करणे बंधनकारक असणे, परंतु याबाबत कोणतीही कार्यवाही केली जात नसल्याने, यबाबत करावयाची कार्यवाही व याबाबात शासनाची प्रतिक्रिया."

## मा. मुख्यमंत्री महोदय यांचे निवेदन

सन १९९७ साली पुणे महानगरपालिकेमध्ये, समाविष्ट झालेल्या २३ गावांचा विकास आराखड्यास शासनाने दि.१७/०५/२००८, दि.१८/०९/२००८, दि.०२/०३/२०१२, दि.०४/०४/२०१२, दि.३०/०८/२०१३ मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१(१) अन्वये टप्प्याटप्प्याने मंजुरी दिलेली आहे. सदर गावासाठीच्या दि.०६/१२/२००७ च्या पुरक विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्र. १३.८ नुसार ४,००० चौ.मी. क्षेत्रावरील रेखांकनामध्ये १५% ॲमिनिटी स्पेस दर्शविणे व एफ.एस.आय. पोटी मनपास हस्तांतरीत करणेची तरतुद होती. सदर गावाच्या विकास योजना आराखड्यामध्ये नियोजन मानकानुसार (Planning Standards) लोकसंख्येचा प्रमाणात आरक्षणे दर्शविणे शक्य नसल्याने आरक्षणाची कमतरता आहे. सदरची कमतरता ॲमिनिटी स्पेसच्या माध्यमातून भरपाई करण्याचे महानगरपालिकेकडुन नियोजित आहे.

शासनाने पुणे महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीच्या सुधारीत विकास योजना आराखड्यास व विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीस दि.०५/०१/२०१७ रोजीच्या अधिसूचनेनुसार मंजुरी दिलेली आहे. सदर नियमावलीतील विनियम क्र. १५.४ मध्ये ४,००० चौ. मी. क्षेत्रावरील रेखांकनामध्ये १५% ॲमिनिटी स्पेस दर्शविणे व एफ.एस.आय. चे बदल्यात मनपास हस्तांतरीत करण्याची तरतुद होती.

दि.०६/१२/२००७ व दि.०५/०१/२०१७ च्या मंजूर विकास नियंत्रण नियमावली / विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतुदीनुसार रेखांकनामध्ये पुढीलप्रमाणे ॲमिनिटी स्पेस दर्शविल्या असून, सद्यस्थितीत पुणे मनपाचे ताब्यात एकूण ७७० मोकळया जागा (ॲमेनिटी स्पेस) उपलब्ध झालेल्या आहेत. त्याचे एकूण क्षेत्र १५४.४७ हेक्टर आहे. त्यापैकी १३२ जागांवर (क्षेत्र ४४.४१ हेक्टर) विविध आरक्षणे आहेत. आरक्षण विरहीत ६३८ (क्षेत्र ११०.०६ हेक्टर) मोकळया जागा असून, ॲमेनिटी स्पेस कमिटीमार्फत ४३३ (क्षेत्र ८३.१३ हेक्टर) जागांवर विविध खात्याची मागणी तसेच स्थानिक नागरिकांच्या व सभासदांच्या मागणीनुसार त्या भागातील सोई-सुविधाची कमतरता लक्षात घेऊन, विकास नियंत्रण नियमावलीनुसार वापर निश्चित करुन ई-लर्निंग स्कुल, जिमनॅशियम, पाण्याच्या टाक्या, सांस्कृतिक केंद्रे, अग्निशामक केंद्रे, उद्याने, कम्युनिटी हॉल, भाजी मंडई इ. विकास कामांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

शासनाने संपूर्ण राज्यासाठी दि.०२/१२/२०२० च्या अधिसूचनेद्वारे यु.डी.सी.पी.आर. नियमावली लागू केलेली असून, सदर नियमावलीमधील विनियम क्र.३.५.१ मधील ॲमिनिटी स्पेसच्या तरतुदीनुसार, उद्याने, खेळाची मैदाने, मनपा शाळा, मनपा दवाखाने, अग्निशामक केंद्र, प्रकल्पग्रस्तासाठी घरे इ. बांधण्यासाठी मनपास अमेनिटी स्पेस घेण्याची तरतुद आहे. सदर वापरा व्यक्तीरिक्त इतर वापराकरीता ॲमेनिटी स्पेसची आवश्यकता असल्यास, मालकाच्या संमतीने ताब्यात घेण्याची तरतुद आहे. तसेच उपरोक्त वापरासाठी अमेनिटी स्पेसची आवश्यकता नसल्यास विकसक / जागा मालकास अमेनिटी स्पेसवर यु.डी.सी.पी.आर. २०२० मधील विनियम क्र.१.३ (७) मध्ये नमूद वापरासाठी विकसित करणे अनुज्ञेय आहे. मालकाने / विकसकाने विकसित केलेली ॲमिनिटी स्पेस ताब्यात देणेचे बंधन नाही.

शासनाने दि.१६/०६/२०२१ च्या अधिसूचनेनुसार सदरचे विनियम क्र.३.५.१ मधील फेरबदलास मंजुरी दिलेली असून, त्यानुसार २०,००० चौ.मी. क्षेत्रावरील रेखांकनामध्ये ५% ॲमिनिटी स्पेस दर्शविणे अनिवार्य केलेले आहे. यु.डी.सी.पी.आर. विनियम क्र.३.५.१.(vii) मधील तरतुदीनुसार सुधारीत रेखांकनामध्ये पूर्व मान्य ले-आऊट मधील दर्शविलेली ॲमेनिटी स्पेस कमी न करता कायम ठेवणेची तरतूद आहे.

यु.डी.सी.पी.आर. २०२० मधील विनियम क्र.२.२.१३ (ix) नुसार जमीन मालकाच्या मागणीवरून ले-आऊट/बांधकाम परवानगी रद्द करण्याची तरतुद आहे. अशा मिळकतीमधील अथवा परवानगी कालबाह्य झालेल्या मिळकतीवर नव्याने प्रस्ताव दाखल केल्यास यु.डी.सी.पी.आर. २०२० मधील तरतूद लागू आहे.

शासनाने दि.१६.०६.२०२१ च्या अधिसुचनेनुसार विनियम क्र.३.५.१ मधील मंजुरी दिलेल्या फेरबदलाबाबत सिटीझन्स फॉर अरीया सभा व इतर यांनी मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका १६/२०२२ दाखल केलेली असून, त्यामध्ये मा.न्यायालयाने "न्यायालयाच्या अंतिम निर्णयास अधीन राहून नवीन प्रस्तावाबाबत कार्यवाही करण्याचे" आदेश दि.०१.०२.२०२२ रोजी दिलेले आहेत. त्याप्रमाणे पुणे महानगरपालिकेतर्फे नवीन प्रस्तावामध्ये मा. कोर्टाचे आदेशानुसार अट टाकुन प्रस्ताव मंजूर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर जनहित याचिकेवर अंतिम निर्णय होणे आहे.

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये महानगरपालिकेने, कोणत्याही मिळकतीच्या ले-आऊट मधील अमेनिटी स्पेस बेकायदेशिररित्या रद्द केली नसून, महानगरपालिकेकडे दाखल होणाऱ्या सर्व रेखांकन/बांधकाम प्रस्तावांना मंजूरी देतेवेळी यु.डी.सी.पी.आर. मधील तरतुदीनुसार नियमोचित कार्यवाही करण्यात येत आहे.

..........................

गृह विभाग लक्षवेधी सूचना क्र.४८३

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे पावसाळी अधिवेशन

**श्री. किसन कथोरे, ॲड.आशिष शेलार, श्री. कुमार आयलानी, श्री. संजय केळकर, श्री. गणपत गायकवाड, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.४८३ पुढीलप्रमाणे आहे -**

"ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ तालुक्यातील कुशिवली येथील कुशिवली धरणासाठी झालेल्या भूसंपादन घोटाळ्यातील सुमारे ४० पेक्षा जास्त आरोपींना मध्यवर्ती पोलीस ठाणे उल्हासनगर यांनी अटक करून योग्य दिशेने तपास सुरु असताना अचानक मध्यवर्ती पोलीस स्टेशन उल्हासनगर यांचेकडून हा तपास काढून घेवून गुन्हे अन्वेषण शाखेकडे तपास देण्यात येणे, कुशिवली धरणाची जमीन हि हाजीमलंग परिसरातील स्थानिक शेतकऱ्यांची असताना बनावट व खोटी कागदपत्रे तयार करून मुळ जमीन मालकांवर अन्याय करून मूळ व खऱ्या जमीन मालकांच्या वारसांना मोबदला न देता इतर नागरिकांनी किंवा भूमाफियांनी सदरचा कोट्यावधी रुपयांचा मोबदला लाटलेला असणे,यामध्ये नायब तहसीलदार व प्रांताधिकारी यांच्या संगनमताने या भूसंपादित जागेचा मोबदला मूळ जमीन धारका ऐवजी बनावट कागदपत्रांच्या आधारे तत्कालीन प्रांताधिकारी यांच्या विश्वासातील व ओळखीच्या माणसांना हा मोबदला देण्यात आल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे या घोटाळ्यात प्रांताधिकारी यांचा सुद्धा हात असल्याचे प्रत्यक्ष दर्शनी दिसून येत असणे, मध्यवर्ती पोलीस स्टेशन उल्हासनगर या गुन्ह्याचा योग्य तपास करीत असताना व या प्रकरणी ४० ते ४५ आरोपींना अटक केलेली असताना सुद्धा मध्यवर्ती पोलीस स्टेशन कडून हा तपास काढून घेवून तो गुन्हे अन्वेषण शाखेकडे (क्राईम ब्रंच कडे) देण्यात येणे त्यामुळे या प्रकरणाचा योग्य तपास करण्याबाबत व आरोपींना कडक शिक्षा होऊन मूळ जमीन मालकांना न्याय देण्याबाबत शंका निर्माण होणे,गोरगरीब शेतकऱ्यांच्या जमिनीची बनावट कागद पत्रे बनवून मोबदला लुटणाऱ्या आरोपींना जामीन झाल्याने गुन्हे अन्वेषण शाखेकडे (क्राईम ब्रंच कडे) साशंकतेने बघणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ तालुक्यातील कुशिवली येथील धरणासाठी आवश्यक जमिनीचे भूसंपादन करण्यात येत आहे. शासनाने सदर भूसंपादनावेळी देऊ केलेला आर्थिक मोबदला अवैध प्रकारे प्राप्त करण्यासाठी जमिनीच्या वारसांच्या नावे बनावट दस्तऐवज बनवणे, त्या आधारे भूसंपादन शाखेत अर्ज व सत्यप्रतिज्ञापत्र सादर करुन तोतया इसमांनी आपणच जमिनीचे मूळ मालक असल्याचे

भासवल्याचे विविध प्रकार निदर्शनास आले आहेत. तसेच बनावट आधारकार्ड, पॅनकार्ड, इ. च्या आधारे बँकेत बनावट खाते उघडणे व सदर खात्यावर भूसंपादनातून प्राप्त होणाऱ्या आर्थिक रक्कमेचा अपहार करण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

जिल्हाधिकारी, ठाणे यांनी सादर केलेल्या अहवालानुसार आरोपींनी बनावट आधारकार्ड व पॅनकार्ड तयार करुन बनावट ओळखपत्रांच्या आधारे बँकेत केवायसी सादर करुन बँक खाते उघडून त्याआधारे उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांच्या कार्यालयाची फसवणूक करुन शासकीय रकमेचा अपहार केल्याचे निष्कर्ष नोंदविले असून सदर प्रकरणामध्ये तत्कालीन उपविभागीय अधिकारी अथवा अन्य अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश नसल्याबाबत निष्कर्ष नोंदविला आहे तसेच विभागीय आयुक्त,भूसंपादन शाखा, कोकण विभाग यांच्या अहवालानुसार, सदर प्रकरणी तत्कालीन उपविभागीय अधिकारी व कर्मचारी यांचा सहभाग नसल्याचे प्रथमदर्शनी आढळून येत असल्याचे नमूद केले आहे.

भूसंपादन घोटाळ्यासंदर्भातील उपरोक्त गुन्ह्यांची व्याप्ती व गांभीर्य लक्षात घेऊन सदर प्रकरणी अधिकच्या तपासासाठी विशेष तपास पथकाची (एस.आय.टी.) स्थापना करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यात शासनाचे झालेल्या नुकसानाबाबत अधिक तपास आवश्यक असल्याने प्रस्तुत प्रकरणाचा तपास गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला असून तपास अधिकारी म्हणून सहायक पोलीस आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली आहे.

सदर भूसंपादन प्रकरणी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने मध्यवर्ती पोलीस ठाणे, ता. अंबरनाथ, जि. ठाणे येथे ५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर गुन्ह्यांतील ५० आरोपींपैकी ४३ आरोपींना मध्यवर्ती पोलीस ठाणे, उल्हासनगर यांनी तर उर्वरित ७ आरोपींना गुन्हे अन्वेषण शाखेकडील विशेष तपास पथकाकडून अटक करण्यात आली आहे.सदर दाखल गुन्ह्यांच्या अनुषंगाने मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.

-------------------------

गृह विभाग | लक्षवेधी सूचना क्र. १७८१

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे पावसाळी अधिवेशन

**श्री. सुरेश (राजूमामा) भोळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

" जि.ठाणे, भिवंडी तालुक्यातील केवणीदिवे येथील सर्व्हे क्र.३८, हिस्सा क्र.१ चे क्षेत्र ०-१०-४ इतक्या क्षेत्राची वसंत भोईर या शेतकऱ्याच्या मालकीची जमीन, अरिहंत कार्पोरेशनचे भागीदार संजय नेमचंद दोढिया यांचेसह तीन विकासकांनी महसूल अधिकाऱ्यांना हाताशी धरुन, बनावट सही करुन व कुलमुखत्यारपत्र तयार करुन शेतकऱ्यांसह न्यायालयाची फसवणूक केल्याप्रकरणी विकासकांच्या विरोधात दिनांक २४ एप्रिल, २०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात येऊनही अद्याप यावर शासन तथा पोलीसांनी कोणतीच कारवाई न केल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, सदरहू मुंबईत मुलुंड येथे राहणाऱ्या तीन विकासकांनी भोईर या शेतकऱ्याच्या मालकीची जमीन बोगस कागदपत्रे बनवून व सही करुन परस्पर अरविंद मनमोहनदास थार यांस बेकायदा विक्री करुन कोटयावधी रुपयांचा आर्थिक घोटाळा करण्यात येणे, या गुन्हयात संजय नेमचंद दोढिया, हसमुख नेमचंद दोढिया, विनोद वाघजी दोढिया यांनी मा.उच्च न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज करताना बनावट कागदपत्र सादर करणे, याबाबत फिर्यादी वसंत भोईर यांनी भिवंडी न्यायालयात अर्ज करुन संजय नेमचंद दोढिया, हसमुख नेमचंद दोढिया, विनोद वाघजी दोढिया यांनी आपल्यासह शासनाची व न्यायालयाची फसवणूक केल्याबाबत दाखल केलेली याचिका, सदरहू प्रकरणी भिवंडी न्यायालयाने सीआरपीसी १५६ (३) नुसार शांतीनगर पोलीस ठाण्यास गुन्हा नोंदविण्याचे आदेश देण्यात येणे, परंतु सदरहू पोलीस ठाण्याचे अधिकारी यांनी अद्यापही यावर कोणतीच कारवाई न करता प्रकरण आर्थिक संगनमताने दडपून टाकण्यात येणे, यामुळे भूमीहीन झालेल्या शेतकऱ्यांवर बेदखल होण्याची आलेली वेळ, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

## मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

बनावट कागदपत्रांआधारे व संगनमताने जमिनीची परस्पर विक्री केल्याबाबतची तक्रार श्री. वसंत लक्ष्मण भोईर यांनी मा. न्यायदंडाधिकारी, भिवंडी यांच्याकडे दि.०६.१०.२०२२ च्या अर्जान्वये केली होती.श्री. वसंत लक्ष्मण भोईर यांनी शांतीनगर पोलीस स्टेशन येथे दाखल केलेल्या तक्रारीसंदर्भात सीआरपीसी कलम १५६(३) अन्वये तपास करण्यासाठी, दिवाणी न्यायालय, भिवंडी यांनी दि.१९.०४.२०२३ रोजी आदेश पारीत

केले आहेत. तदनंतर या संदर्भात शांतीनगर पोलीस स्टेशन, भिवंडी, येथे गु.र.क्र. २९८/२०२३ भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ अन्वये, दि.२१.०४.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी संजय नेमचंद दोढिया, हसमुख नेमचंद दोढिया, विनोद वाघजी दोढिया यांनी सेशन कोर्ट, ठाणे येथे अटकपूर्व जामीन अर्ज क्रमांक १४४४/२०२३ दाखल केला असून, सेशन कोर्टाने प्रस्तुत प्रकरणी आरोपींना दिनांक ०४.०५.२०२३ रोजी अंतरीम जामीन मंजुर केलेला आहे.

त्यापुर्वी मुलुंड येथे राहणाऱ्या तीन विकासकांनी श्री.भोईर या शेतकऱ्याच्या मालकीची जमीन बोगस कागदपत्रे बनवून सही करुन परस्पर श्री. अरविंद थार यांना बेकायदा विक्री केल्याबाबत शांतीनगर पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे. सदर प्रकरणी खोट्या दस्तऐवजाआधारे जमिनीची परस्पर विक्री करण्यासाठी बनावट कुलमुखत्यारपत्र तयार केल्याप्रकरणी मा. न्यायालयाने सदर प्रकरणी सीआरपीसी १५६(३) अन्वये तपास करण्याबाबत आदेशीत केले होते. त्यानुसार शांतीनगर पोलीस स्टेशन, ठाणे येथे ७ जणांविरुद्ध गु.र.क्र.४५/२०१८ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४७४, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यापैकी बनावट सह्या व त्याआधारे केलेल्या बनावट कुलमुखत्यारपत्राआधारे, मुलुंड येथील विकासक श्री. संजय दोढीया, श्री. हसमुख दोढीया, श्री.विनोद दोढीया , मयत श्री. दामोदर भोईर व श्री. राम भोईर यांनी संगनमताने श्री. भोईर यांच्या मालकीच्या क्षेत्रापैकी १२५० चौ.मी. जमीन मिळकतीची विक्री केल्याचे निष्पन्न झाले आहे. उपरोक्त नमूद मयत आरोपी वगळता इतर ४ आरोपींविरुद्ध मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

-----------------------------

**म.वि.नि.१०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र. १८१५**

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन**

मा.श्री. मोहनराव हंबर्डे व मा.श्री. राजु (बाबा) जयवंतराव आवळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे.:-

"महाराष्ट्र राज्यातील मुंबई कुळवहिवाट शेतजमिन अधिनियम १९४७ कलम ३२ (म) प्रमाणपत्रान्वये नोंदणीकृत खरेदी केली जाते व खरेदी झालेले नोंदणीकृत खरेदीखत आव्हानित जर करायचे असेल तर ते फक्त दिवाणी न्यायालयाला अधिकार असतात परंतु कलम ३२ (म) प्रमाणपत्र नोंदणीकृत खरेदीचे अर्धन्यायिक न्यायालय महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण जिल्हाधिकारी उपविभागीय अधिकारी व तहसिलदार शेतजमिन न्यायाधिकरण यांच्याकडे कलम ३२ (म) अन्वये नोंदणीकृत झालेले खरेदीखत 'सुध्दा आव्हानित करण्यात येते जेव्हा की कुठल्याही नोंदणीकृत खरेदीखत हे कायद्याने अर्धन्यायिक न्यायालय रद्द करुन शकत नाही हि वस्तूस्थिती असल्याचे दिनांक २८/०४/२०२३ रोजी प्रधानसचिव महसूल विभाग यांना नागरीकांची रीतसर निवेदन सादर करुनही आजमितीस सदर प्रकरणी कुठलेही अद्यादेश निर्गमित होत नसल्याने मुंबई कुळवहिवाट शेतजमिनीतील प्रकरणे मोठ्या प्रमाणात गुंतागुंतीचे होऊन शासन दरबारी व अर्धन्यायिक न्यायालयामध्ये आव्हानित प्रकरणाचे खच होऊन पडलेला आहे पंधरा ते वीस वर्ष कायमचा निकाल मिळत नसल्याने जनतेचे हाल बेहाल व प्रचंड प्रमाणात पैसा खर्च होतांना दिसत आहे त्यामुळे शासन स्तरावरती कुळ कायदा कलम ३२ (म) नोंदणीकृत खरेदीखत हा दिवाणी न्यायालयात स्थलांतरित करण्याचे तात्काळ अद्यादेश काढण्यासाठी शासनाने कडक धोरण अवलंबून शासनाने करावयाची कार्रवाई शासनाची प्रतिक्रिया व भूमिका"

---

## मा.श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मंत्री (महसूल) यांचे निवेदन

महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ मधील कलम ३२ (ग) अन्वये मुळाच्या नावे खरेदीची किंमत ठरविल्यानंतर अशा कुळास कुळकायदा कलम ३२ (म) प्रमाणपत्र देण्यात येते. सदरचे प्रमाणपत्र हे दुय्यम निबंधक येथे नोंदणीकृत केल्यानंतर सदर ३२ (म) प्रमाणपत्राची महसूल दप्तरी नोंद घेण्यात येते. महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ मधील कलम ३२(ग) प्रमाणे मालक व कुळ यांच्या नात्याबाबत खरेदी व हक्काबाबत चौकशी होऊन खरेदीहक्क दिले जातात अथवा नाकारले जातात. सदर आदेशाच्या अनुषंगाने झालेल्या ३२(म) प्रमाणपत्राची नोंद घेतली जाते. या आदेशाविरुध्द व त्या आदेशाचे अनुषंगाने झालेल्या फेरफार नोंदीवर कुळकायदा कलम ७४ व ७४- अ नुसार उपविभागीय अधिकारी यांचे अर्धन्यायिक न्यायालयात आव्हानीत करण्याबाबत तरतूद आहे.

तसेच प्रस्तुत प्रकरणी दि.२८/०४/२०२३ रोजीचे प्रधान सचिव, महसूल यांना सादर केलेले निवेदन या कार्यासनास प्राप्त झालेले नाही.

याप्रमाणे, महाराष्ट्र राज्यातील मुंबई कुळवहिवाट शेतजमिन अधिनियम १९४७ कलम ३२ (म) प्रमाणपत्र नोंदणीकृत खरेदीचे अधिकार उपविभागीय अधिकाऱ्यांना दिलेले असल्याने, सदरील अधिनियमान्वये या प्रकारची प्रकरणे ही महसूली अधिकारी/ महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण यांच्याकडे चालत असल्याने दिवाणी न्यायालयांना या प्रकरणांमध्ये आव्हान देण्याची कायद्यात कोणतीही तरतूद नाही.

तसेच मुंबई कुळवहिवाट शेतजमिनीतील प्रकरणे मोठया प्रमाणात गुंतागुंतीचे होऊन शासन दरबारी व अर्धन्यायिक न्यायालयामध्ये आव्हानित प्रकरणाचे खच होऊन पडलेला आहे अशी बाब शासन स्तरावर निर्देशनास आलेली नाही.

*********************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे पावसाळी अधिवेशन

लक्षवेधी सुचना क्र. १४७४

श्री. प्रकाश आबीटकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सुचना क्रमांक १४७४ पुढीलप्रमाणे आहे.

"कोल्हापूर जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये प्रकल्पग्रस्तांची राजरोस पने आर्थिक लुबाडणूक होणे, कोल्हापूरमध्ये तुळशी, पाडगाव, धामणी, दूधगंगा, नागवणी, सर्पनाला, आंबेओहोळ, उचली यासह दूधगंगा डावा-उजवा कालवा यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने शेकडो हेक्टर जमीन संपादित करणे, त्या जमिनीवर अनेक प्रकल्प पूर्ण झाले असून काही प्रकल्पांची कामे सुरू असणे, प्रकल्पग्रस्तांना विहित वेळेत प्रकल्पग्रस्ताचा दाखला तसेच प्रकल्पग्रस्तांचा निर्वाह भत्ता, त्यांना मिळणारे विविध लाभ व पर्यायी जमीन देण्यासाठी जाणीवपूर्वक देरी करणे, काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर जिल्हा पुनर्वसन अधिकारी, अतिरिक्त जिल्हाधिकारी यांचा वरद हस्त असल्याने जिल्हा पुनर्वसन कार्यालयातील अनेक फाईल पेंडिंग असणे, एजंटामार्फत होणारी आर्थिक लुबाडणूक थांबविण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कोणतीही कारवाई न होणे, प्रकल्पग्रस्तांचे दाखले देण्यासाठी सहा-सहा महिने जाणीवपूर्वक विलंब करणे, वेगवेगळ्या ना-हरकत दाखल्यांसाठी जाणीवपूर्वक आर्थिक देवाणघेवाणीसाठी सामान्य नागरीकांस वेठीस धरणे, भूसंपादन व प्रकल्पग्रस्तांना जमीन वाटप व विविध सुविधा जिल्हा पुनर्वसन कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडून देण्यास जाणीवपूर्वक दिरंगाई करणे, याबाबत वारंवार तक्रारी करून सुद्धा जिल्हाधिकाऱ्यांकडून कोणतीही कारवाई न होणे, मा.मुख्यमंत्री यांच्याकडे याबाबत दिलेल्या लेखी तक्रारी वर स्वतंत्र चौकशी अधिकारी नेमून यातील दोषींवर तत्काळ कारवाई करण्याबाबतचे स्पष्ट निर्देश राज्याचे मुख्यमंत्र्यांनी देऊन सुद्धा आयुक्त पुणे जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी कोणतीही कार्यवाही न करणे, सेवा हमी कायदा, दप्तर दिरंगाई कायदा येथील लोकसेवकांनी आर्थिक मागणी (लाच) करून या सर्व नियमांना पायदळीत तुडवून राजरोसपणे प्रकल्पग्रस्तांची लुबाडणूक होत असणे, त्याबाबत आयुक्त, पुणे व जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी कोणतीही कारवाई न करणे, त्यामुळे प्रकल्पग्रस्तांच्या मनात निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे निवेदन

कोल्हापुर जिल्ह्यात एकुण ५३ पाटबंधारे प्रकल्प असुन तुळशी, दुधगंगा, वारणा, कुंभी, कडुवी व कासारी या प्रकल्पांना ४५ वर्षांपेक्षा अधिक कालावधी झालेला आहे. सद्यस्थितीत आंबेओहोळ, उचंगी, सर्फनाला, धामणी व नागनवाडी हे प्रकल्प सुरु असुन आंबेओहोळ व उचंगी प्रकल्पाची घळभरणी २०२१, नागनवाडी प्रकल्पाची घळभरणी २०२२ मध्ये पुर्ण झालेली आहे तसेच सर्फनाला व धामणी या प्रकल्पांची घळभरणी सन २०२३ मध्ये करण्याचे नियोजीत आहे. कोल्हापुर जिल्ह्यातील प्रकल्पनिहाय पुनर्वसनविषयक कामकाज पुढीलप्रमाणे आहे.

आंबेआहोळ प्रकल्पातंर्गत ५२७ प्रकल्पग्रस्त पर्यायी जमिन मिळण्यास पात्र असुन त्यापैकी १६० प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिन वाटप केली असुन उर्वरीत ३०२ प्रकल्पग्रस्तांना आर्थिक सहाय्य वाटप केले आहे. उर्वरीत ६५ प्रकल्पग्रस्तांकडुन कागदपत्रांची पुर्तता करुन घेवुन वाटपाची कार्यवाही करण्यात येत आहे.

नागनवाडी प्रकल्पातंर्गत २३३ प्रकल्पग्रस्त पर्यायी जमिन मिळण्यास पात्र असुन त्यापैकी ४५ प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिन वाटप केलेली असुन उर्वरीत १६५ प्रकल्पग्रस्तांना आर्थिक सहाय्य वाटप केले आहे. उर्वरीत २३ प्रकल्पग्रस्तांकडुन कागदपत्रांची पुर्तता करुन घेवुन वाटपाची कार्यवाही करण्यात येत आहे.

धामणी प्रकल्पातंर्गत १३५ प्रकल्पग्रस्त पर्यायी जमिन मिळण्यास पात्र असुन त्यापैकी १०५ प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनींचे वाटप केलेले असुन उर्वरीत ३० प्रकल्पग्रस्त यांचेकडुन कागदपत्रांची पुर्तता करुन वाटपाची कार्यवाही करण्यात येत आहे.

उचंगी प्रकल्पातंर्गत २३५ प्रकल्पग्रस्त पर्यायी जमिन मिळण्यास पात्र असुन त्यापैकी १४६ प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनींचे वाटप केलेले आहे. उर्वरीत ९० प्रकल्पग्रस्तांना आर्थिक सहाय्य वाटप केलेले असुन उर्वरीत ८ प्रकल्पग्रस्त यांचेकडुन कागदपत्रांची पुर्तता करुन वाटपाची कार्यवाही करण्यात येत आहे.

सर्फनाला प्रकल्पातंर्गत २०६ प्रकल्पग्रस्त पर्यायी जमिन मिळण्यास पात्र असुन त्यापैकी १३४ प्रकल्पग्रसतांना पर्यायी जमिनींचे वाटप केलेले आहे. तसेच २५ प्रकल्पग्रस्तांना आर्थिक सहाय्य वाटप केलेले असुन उर्वरीत ४७ प्रकल्पग्रस्तांकडुन कागदपत्रांची पुर्तता करुन वाटपाची कार्यवाही करण्यात येत आहे.

चिकोत्रा प्रकल्पात १२३ प्रकल्पग्रसत पर्यायी जमिन मिळण्यास पात्र असुन त्यापैकी १०३ प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिन वाटप केलेली असुन उर्वरीत २० प्रकल्पग्रस्तांकडुन कागदपत्रांची पुर्तता करुन वाटपाची कार्यवाही करण्यात येत आहे. वारणा प्रकल्पात ७४९ प्रकल्पग्रस्त पात्र असुन त्यापैकी ७२० प्रकल्पग्रस्तांना क्षेत्राचे वाटप केलेले असुन उर्वरीत २१ प्रकल्पग्रस्तांकडुन कागदपत्रांची पुर्तता करुन वाटपाची कार्यवाही करण्यात येत आहे. दुधगंगा प्रकल्पात ११६५ प्रकल्पग्रस्त पात्र असुन त्यापैकी आजतायागत ९७१ प्रकल्पग्रस्तांना क्षेत्राचे वाटप केलेले असुन उर्वरीत १९४ प्रकल्पग्रस्तांकडुन कागदपत्रांची पुर्तता करुन वाटपाची कार्यवाही करण्यात येत आहे.

कडवी प्रकल्प तसेच तुळशी प्रकल्पातील सर्व पात्र प्रकल्पग्रस्तांना क्षेत्राचे वाटप केलेले आहे.

आंबेओहोळ, कडवी, तुळशी, चिकोत्रा, वारणा, दुधगंगा, चित्री व पाटगांव या प्रकल्पांशी संबधित लाभक्षेत्रातील पुनर्वसन विषयक नाहरकत दाखले मिळणेकामी प्राप्त ७२७ अर्जांपैकी ६२४ अर्ज निर्गत केलेले आहे. तसेच नोकरीविषय दाखलेबाबत सन २०२० ते आजअखेर १२२४ अर्ज प्राप्त झाले असुन ९८२ प्रकल्पग्रस्तांना दाखला वितरीत करण्यात आले आहे. २४२ अर्जदारांचे अर्ज निकाली काढण्यात आले आहे. तर शैक्षणीक दाखले मिळणेकामी ५४ अर्ज प्राप्त झाले असुन सर्व निकाली काढण्यात आले आहे.

कोल्हापुर जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्पामुळे विस्थापीत झालेल्या बाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९७६, १९८६ व १९९९ मधील तरतुदीन्वये पात्रता तपासुन जमिन व भुखंडाचे वाटप केले जाते. तसेच निर्वाहभत्ता वाटप करण्याबाबतची कार्यवाही जलसंपदा विभागाकडुन करण्यात येते.

जिल्हा पुनर्वसन कार्यालय, कोल्हापुर यांचेकडील अपुरा कर्मचारी वर्ग, तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई व जिल्हा न्यायालयामध्ये दाखल असलेल्या प्रकरणामध्ये मुद्देनिहाय अहवाल/प्रतिज्ञापत्र दाखल करणे याकामी बहुतांश वेळ जात असुन तसेच अर्जदारांनी दाखल केलेले कागदपत्रे अपुर्ण असल्याने व अर्ज निकाली काढतांना भुसंपादन, पाटबंधारे व तहसिलदार यांचे कार्यालयाकडील अहवाल प्रात करुन घेणे आवश्यक आहे. तथापि, जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत विविध कार्यालयांकडुन सर्व अहवाल व अर्जदारांकडील अपुर्ण कागदपत्रे प्राप्त करुन घेवुन तातडीने कार्यवाही करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे मा. विधानसभा सदस्यांनी कोल्हापुर जिल्हाधिकारी कार्यालयातील पुनर्वसन शाखेतील कामकाजाबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांना दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार आवश्यक ती कार्यवाही महसुल विभागामार्फत करण्यात येत आहे. तसेच कोल्हापुर जिल्हा पुनर्वसन कोल्हापुर यांच्या कार्यालयाकडील दप्तर तपासणीकामी विभागीय आयुक्त पुणे यांनी स्वतंत्र चौकशी समिती नेमण्यात आलेली आहे.

*******************************************************************